# मिरा भाईंदर महानगरपालिका

## विधी विभाग

जा.क्र.मनपा/ विधी/ 518 /2025-26 दि.24/11/2025

प्रति,

1) प्र.सिस्टम मॅनेजर,
माहिती व तंत्रज्ञान विभाग

2) जनसंपर्क अधिकारी
जनसंपर्क विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- जाहिर दरपत्रक सूचना प्रसिद्ध करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेविरूद्ध अथवा महानगरपालिकेच्यावतीने दाखल होणा-या विविध मा. न्यायालयाने न्यायप्रविष्ठ प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात दावे/याचिका व इतर कागदपत्रे छायांकित प्रती काढाव्या लागत आहेत. झेरॉक्स करणेकामी विधी विभागामार्फ़त दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी सोबत जोडलेली सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तसेच महानगरपालिकेच्या सूचना फ़लकावर प्रसिद्ध करण्यात यावी, हि विनंती.

विधी अधिकारी
मिरा भाईंद महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प) ता.जि.ठाणे - 401 101

जा.क्र.मनपा/विधी/ 518 /2025-26 दि.24/11/2025

## //जाहिर निविदा वजा दरपत्रक सूचना//

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विधी विभागास न्यायालयीन कामकाजाकरिता मोठ्या प्रमाणात वेळोवेळी छायांकित प्रती काढाव्या लागत आहेत. तरी सदर छायांकित प्रती करण्याकरिता खालील नमूद अटी शर्तीनुसार सदरच्या सेवा पुरविणा-या झेरॉक्स सेंटर्स/एजन्सी/व्यक्ती यांच्याकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदर छायांकित प्रती करण्याचे काम 2 वर्षांच्या कालावधीकरिता राहील.

**निविदा वजा दरपत्रकातील अटीशर्ती (अर्हता) :-**

1) इकडील विभागात छायांकित प्रती दररोज मोठ्या प्रमाणात व वारंवार काढावयाच्या असतात त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयापासून झेरॉक्स सेंटर्स/संस्था दूर अंतरावर (मनपा क्षेत्रापासून) असल्यास झेरॉक्स सेंटर्स/संस्था यांनी आपल्या स्तरावर व्यक्ति नेमून छायांकित प्रती काढणेकरिता व्यवस्था करून देणे बंधनकारक राहिल.
2) मिरा भाईंदर महानगरपालिकेचे परवानाधारक असणे आवश्यक आहे.
3) गुमास्ता परवानाधारक असणे आवश्यक आहे.

इकडील विभागास आवश्यक असणा-या छायांकित प्रती विविध आकारांच्या कागदांवर काढाव्या लागत असल्यामुळे (Paper size wise) पुढीलप्रमाणे छायांकित प्रती व कुरीअर करणेकामी दर मागविणे अपेक्षित आहे :-

1) Xerox on Legal size (White paper)
2) Xerox on Legal size (Ledger paper)
3) Xerox on A4 size
4) Color Xerox/Photographs
5) Xerox of Map/Plans
6) Courier

सदर छायांकित प्रती व कुरिअर करणेकामी सादर करावयाचे दर दोन वर्षांच्या कालावधीकरिता सादर करावेत. तरी सदरच्या सेवा पुरविणा-या झेरॉक्स सेंटर्स/एजन्सी/व्यक्ती यांनी मोहोरबंद लिफ़ाफ्यात वरील नमुद वर्गवारी निहाय आपले दरपत्रक महानगरपालिकेच्या विधी विभाग, 1ला मजला यांचेकडे सादर करावेत. सदरचे निविदा वजा दरपत्रक दि.01/12/2025 रोजी सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत स्विकारण्यत येतील.

Svadke

सई वडके
विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner